अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# अशाने कायद्याचा धाकच उरणार नाही

आपल्या देशात लोकशाही मूल्यांचा ऱ्हास कोणामुळे होत असेल तर तो राजकारण्यांमुळे होतो. फार मोठ्या कष्टाने भारतीय लोकशाहीची घटनात्मक चौकट तयार केली गेली. ती तयार करताना सामान्य माणसाची सामाजिक सुरक्षा आणि राष्ट्राचे सर्वगामी संरक्षण याला अत्यंत महत्त्व दिले गेले होते. परंतु दुर्दैवाने आपल्या देशातल्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या ६० वर्षांत या लोकशाहीची चौकट अक्षरश: विस्कटून टाकली. सत्ताकारणाचा, राजकारणाचा केवळ स्वत:साठी वापर केला आणि त्यामुळे आज कायद्याविषयी, नियमांविषयी कोणामध्येही पाहिजे तसा धाक राहिलेला नाही. आदरसुद्धा उरलेला नाही. याचे ताजे उदाहरण म्हणजे, अभिनेता संजय दत्त याने पुन्हा पॅरोलची मुदत वाढवून देण्याची विनंती केली आहे. स्वत:कडे शस्त्र बाळगल्याप्रकरणी त्याला तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे. आतापर्यंत पत्नीच्या आजारपणाचे कारण पुढे करून त्याला दोन वेळा पॅरोल मिळाला आणि आतादेखील तेच निमित्त पुढे करून त्याने हा पॅरोल वाढवून मागितला आहे. संजय दत्त आणि एकूणच सत्ताधारी काँग्रेस पक्ष यांचे केवळ घनिष्ट नव्हे तर घरोब्याचे संबंध असल्याचे सगळ्यांनाच माहीत आहे. त्याला अटक होऊ नये इथपासून ते या सगळ्या आरोपांमधून त्याची सहीसलामत सुटका व्हावी असाही प्रयत्न राजकीय पातळीवर केला गेला. परंतु आज भारतामध्ये सामान्य माणसाला न्यायालयाकडूनच थोडाफार दिलासा मिळतो. न्यायव्यवस्था आपापल्या परीने शक्य तितके कठोर निर्णय घेत असते. समाजाला आणि एकूणच देशाच्या व्यवस्थेला धक्का लागणार नाही यासाठी न्यायालयाकडून दिले जाणारे निर्णय महत्त्वपूर्ण ठरत आले आहेत. संजय दत्तच्या प्रकरणात त्याला अनपेक्षित अशी शिक्षा ठोठावण्याचे काम न्यायालयाने केले. या सगळ्या प्रकरणामध्ये न्यायालयाने आपली बाजू उत्तम रितीने पार पाडली. परंतु आता त्या आदेशाची अंमलबजावणी तितक्याच काटेकोरपणे करण्यात चालढकल केली जात आहे आणि म्हणूनच संजय दत्तचे सत्ताधाऱ्यांशी असलेले संबंध त्याला वारंवार पॅरोल मिळवून देत आहेत. हे जर असेच चालत राहिले तर सामान्य माणसाचा कायद्यावर विश्वास कसा राहील? आणि सुव्यवस्थेविषयी आदर तरी कसा राहील? असा प्रश्न निर्माण होतो. अशा प्रकारची विशेष सवलत इतर सामान्य कैद्यांना मिळू शकत नाही. कारण त्यांचे सत्ताधाऱ्यांशी किंवा राजकारण्यांशी घरोब्याचे संबंध नसतात.

## सामान्य कैद्यांचे काय

महाराष्ट्रात तर गेल्या २०-२५ वर्षांपासून राजकारणाचे चांगलेच गुन्हेगारीकरण झाले. अनेक गुन्हेगारांनी राजकारणाचा आश्रय घेऊन आपले बस्तान आणखीनच भक्कम केले. समाजामध्ये दहशत पसरविणारे अनेक गुन्हेगार राजकारणात घुसल्याने उजळ माथ्याने फिरत आहेत. प्रतिष्ठा आणि पैसा या दोन्ही गोष्टी मिळविण्यात या लोकांना यशही आले आहे. खरे तर आपल्या घटनात्मक चौकटीमध्ये सामान्य माणसाला विशेष हक्क दिले गेले आहेत. त्याच्या संरक्षणासाठी राज्यकर्त्यांनासुद्धा योग्य तो धडा शिकविण्याची तरतूद आपल्या घटनेने करून ठेवली आहे. आज मात्र या घटनात्मक चौकटीचीच राजकारण्यांकडून मोडतोड केली जाते. कायदे, नियम किंवा अनुशासन हे फक्त सामान्य माणसांनी पाळायचे. राजकारणात असलेल्यांनी मात्र ते बिनदिक्कतपणे धाब्यावर बसवायचे हा पायंडा इतका घट्ट झाला आहे की, पोलीस यंत्रणासुद्धा शक्य तो राजकारण्यांच्या वाटेला जात नाही. मात्र ज्यावेळी सगळ्याच बाजूंनी काही राजकीय नेते घेरले जातात तेव्हा कायद्याला आपला मार्ग अनुसरावा लागतो. हीच परिस्थिती संजय दत्त याच्या बाबतीत झाली. त्याचे वडील अनेक वर्षे खासदार होते, मंत्रीही झाले होते. आता त्याची बहीणही खासदार आहे. असे सगळेच राजकीय हितसंबंध असल्यामुळे त्याची या प्रकरणातून सहीसलामत सुटका व्हावी म्हणून अनेक प्रयत्न झाले. त्यात यश आले नाही आणि शेवटी नाइलाजाने आहे ती शिक्षा भोगून मोकळे होण्याशिवाय संजय दत्तपुढे पर्याय उरला नाही. परंतु आपण राजकारण्याचे पुत्र आहोत अशा कुठल्यातरी मिजाशीमुळे थेट एके-४७ सारखी रायफल घरामध्ये बाळगण्याचा उद्दामपणा त्याच्याकडून झाला. कारण कायदा आपले काहीही वाकडे करू शकणार नाही, अशीच मनामध्ये ठाम समजूत होती. त्याच्याकडून हा अपराध घडला आणि आज त्याला त्याची शिक्षा भोगावी लागत आहे. मात्र आतासुद्धा नियमानुसार शिक्षा भोगण्याऐवजी पळवाटा काढण्याचे उद्योग सुरू आहेत. राजकीय संबंधांचा वापर करून पॅरोलवर पॅरोल मिळविण्याचा सपाटा त्याने सुरू केलेला दिसतो. यामुळे पुन्हा एकदा त्याच्या मनात कायद्याविषयी आदर तर निर्माण होणार नाहीच, पण सामान्य माणसालादेखील कायदा हा राजकारण्यांसाठी किंवा त्यांच्या मुलाबाळांसाठी पाहिजे तसा वाकवला जातो अशीच समजूत निर्माण होणार आहे. नियमानुसार खरे तर प्रत्येक कैद्याला पॅरोल मिळतो. परंतु ज्यांचे वशिले नसतात त्यांना पाच-पाच वर्षे एकही पॅरोल मिळत नाही. पण ज्यांचे थेट संबंध असतात ते अशा प्रकारचा पॅरोल मिळवितात. कायद्याने असा दुजाभाव केला जातो आणि तोच समाजाच्या मनातही खोल रूजून बसतो.

## कठोर अंमलबजावणी हवी

आज आपण लोकशाही मूल्यव्यवस्थेचे कौतुक करतो. त्यामध्ये जर कायद्याचा सत्ताधारी आपल्या सोयीप्रमाणे वापर करणार असतील तर, या मूल्यव्यवस्थेला त्यांच्याकडूनच नख लावले जाते असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही. जे काही कायदेकानून किंवा नियम असतील ते सामान्य माणसाने पाळायचे. राजकारण्यांना मात्र त्याचे बंधन असता कामा नये, अशी एक ठाम समजूत निर्माण झालेली आहे. कायद्याचे हात लांब असतात असे आपण नेहमी म्हणतो. गुन्हेगार शोधून काढताना कायदा त्याच्यापर्यंत पोहोचतो ही गोष्ट खरी आहे. परंतु याच कायद्याचे हात राजकारणी आपल्यापर्यंत पोहचू नये म्हणून सर्व प्रकारची काळजी घेतात. याची अनेक उदाहरणे देता येतील. अनेक राजकारण्यांचे हस्तक फरार म्हणून घोषित केले जातात. अनेक गुन्हे असूनही त्यांना पकडण्यासाठी टाळाटाळ केली जाते. राजकीय वैमनस्य मनामध्ये ठेवून अनेकांना विनाकारण गुन्ह्यांमध्ये अडकविलेही जाते. असा हा कायद्याचा किंवा घटनात्मक चौकटीचा स्वत:च्या फायद्यासाठी वापर होत असतो. कायद्याविषयी लोकांच्या मनात विश्वास निर्माण व्हायचा असेल, हे कायदे आपल्या संरक्षणासाठी आहेत आणि समाजाची व्यवस्था टिकविण्यासाठी आहेत, अशी भावना दृढमूल करायची असेल तर त्याची कठोर अंमलबजावणी सत्ताधाऱ्यांकडून झाली पाहिजे.